पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८ मुख्य लेखापरिक्षण विभाग
पत्र क्र. :- मुलेप/कावि/६/१२६/२०१८
दिनांक :- ०२/०८/२०१८

प्रति,

१) शहर अभियंता,
२) सह शहर अभियंता, ( BRTS/EWS/BSUP ),
३) सह शहर अभियंता, ( पा.पु. जलनि:सारण),
४) सह शहर अभियंता, ( पर्यावरण),
५) सह शहर अभियंता, ( विद्युत ),

**विषय :- निविदेतील अटी/शर्ती बाबत.....**

पिंपरी चिंचवड म.न.पा. चे स्थापत्य व इतर विभागामार्फत भांडवली विकास कामांचे संदर्भात निविदा प्रसिध्द करणेत येतात. सदर निविदा अटी/शर्तीमध्ये प्रामुख्याने पात्र कंत्राटदारांसाठी अटींची पूर्तता करीत असलेल्या सर्व ठेकेदारांस पात्र ठरविण्यात येत असून तद् नंतर सदरच्या निविदा नस्ती दर स्विकृती व पूर्व लेखापरिक्षणास मुलेप विभागात पाठविण्यात येत आहेत.

या संदर्भात आपणास सुचित करणेत येते की, निविदा प्रक्रियेतील पूर्व अर्हता निश्चीतीबाबतच्या अटी शर्तीची पूर्तता पडताळणीकामी अशा या निविदा नस्ती सादर करते वेळी खालील प्रमाणे आवश्यक ती माहिती व तौलनिक/तुलनात्मक तक्ते स्वंतत्रपणे निविदा नस्ती सोबत सादर करावेत.

| अ.क्र. | निविदेतील अट | आवश्यक पूर्तता |
|---|---|---|
| १ | मागली तीन वर्षात कंत्राटदाराने तुल्यबळ किंमतीचे किमान एक त्याच स्वरूपाचे ३०% (अथवा अटी/शर्तीमध्ये नमूद) काम केलेले आहे काय ? | या संदर्भात पात्र कंत्राटदाराने केलेल्या कामाचे नांव, कामाचा निविदा क्रमांक, काम पूर्णत्वाचा दिनांक व रक्कम याबाबतची माहिती तौलनीक तक्त्यामध्ये देण्यात यावी. |
| | देय कामासाठी मागील ३ वर्षापैकी कोणत्याही एका वर्षात ज्या महत्वाच्या परिमाणाच्या बाबी करावयाच्या आहेत, त्याचे ३०% (अथवा अटी/ शर्तीमध्ये नमूद) परिमाण आहेत काय? | या संदर्भात सोबतच्या तक्त्या माहिती नमुद करून निविदा नस्तीमध्ये समाविष्ठ करावी. |

वरील प्रमाणे, पूर्तता  न केल्यास दर स्विकृती नस्तीवर मु.ले.प. विभागामार्फत अभिप्राय न देता नस्ती पूर्व पृष्ठावरील सुचनेप्राणे पूर्ततेकामी विभागास पाठविण्यात येईल व याकामी होणा-या विलंबाची संपूर्ण जबाबदारी विभागावर राहिल, यांची नोंद घेण्यात यावी.

**सही/-**
**( आमोद कुंभोजकर )**
मुख्यलेखापरिक्षक
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८

प्रत,

१) मा. आयुक्त, पिं.चिं.म.न.पा.
२) अति. आयुक्त, पिं.चिं.म.न.पा.
३) मुलेप सर्व गट प्रमुख

माहितीसाठी...

सोबत,

माहिती भरून द्यावयाच्या तक्ताचा नमुना

| **अ.क्र.** | **चालू अंदाजपत्रकातील महत्वाच्या बाबींचे अ.क्र. (Schedule B) क्रमांक** | **एकूण परिमाण** | **३०% प्रमाणे होणारे परिमाण** | **कंत्राटदाराने कोणत्या एका वर्षात परिमाणाच्या ३०% परिमाणचे काम केले आहेत, त्या कामाच्या संदर्भातील त्या परिमाणाची एकूण होणारी आकडेवारी/बेरीज** |
|---|---|---|---|---|
| | | | | |